# विशेष पोलीस वार्तापत्र,

**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

**दिनांक - ३१/०३/२०२५**

## कळंब येथील गुन्ह्यात फरार असलेला मुख्य सुत्रधार इस्तीयाक खातीब याला अटक

## स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांची नागपूरात अंमली पदार्थ विरोधात कारवाई

## चरस (Hashish), MD (Mephedrone) जप्त

मा. पोलीस अधीक्षक सा. यवतमाळ यांचे नेतृत्वात यवतमाळ जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अंमली पदार्थ विरोधी मोहिमे दरम्यान दिनांक २८/०३/२०२५ रोजी कळंब येथे गुन्ह्यात नागपूर येथील अभय राजेंद्र गुप्ता वय ३० वर्ष रा. बुटीबोरी, एक.आय.डी.सी, जि. नागपूर याचे ताब्यातून २६ ग्रॅम MD (Mephedrone) नावाचा सदृश अंमली पदार्थ एकुण किं. १,४०,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

दिनांक २८/०३/२०२५ पासून गुन्ह्यात फरार असलेला मुख्य सुत्रधार इस्तीयाक खातीब याला अटक करण्यासाठी तसेच अंमली पदार्थ संबंधाने जिल्ह्यात असलेले जाळे उध्वस्त करण्याच्या सुचना मा. पोलीस अधीक्षक सा, यवतमाळ यांनी दिल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मुख्य सुत्रधाराचा कसोशीने शोध घेत असतांना दिनांक ३०/०३/२०२५ रोजीचे रात्री दरम्यान गुन्ह्यातील फरार आरोपी इस्तीयाक हुसेन मुस्तफा हुसेन ऊर्फ इस्तीयाक खातीब रा. बडा ताजबाग हा निर्मल नगरी, टाऊनशिप या उच्चभ्रु वस्तीमध्ये राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन निर्मल नगरी टाऊनशिप मध्ये सापळा रचून आरोपीचा शोध घेत असतांना **इस्तीयाक हुसेन मुस्तफा हुसेन ऊर्फ इस्तीयाक खातीब वय ४५ वर्ष रा. बडा ताजबाग, ह.मु. निर्मल नगरी, टाऊनशिप, नागपूर** हा पळून जाण्याच्या तयारीत असतांना त्यास क्षणाचाही विलंब न करता शिताफीने ताब्यात घेऊन त्याचेकडून १५.३० ग्रॅम MD (Mephedrone) नावाचा सदृश अंमली पदार्थ किंमत ७६,५००/- रु तसेच ०८.७५ ग्रॅम चरस (Hashish) किंमत ४३,७५०/- रु व अंमली पदार्थ विकून त्याचेकडे असलेली नगदी रक्कम २,३८,०००/- असा एकुण ३,५८,२५०/- रु चा मुद्देमाल जप्त करुन त्यास पो.स्टे कळंब येथे नोंद गुन्ह्यात अटक करण्यात आली. इस्तीयाक खातीब हा ताजबाग दर्ग्यामध्ये सेवेकरी (खातीब) म्हणून काम करीत असल्याची माहिती मिळाली असून तो अंमली पदार्थ विक्रीचे जाळे विदर्भात पसरवित असल्याचीही माहिती प्राप्त झाली आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ श्री. कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक, श्री. पियुष जगताप, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ श्री. सतिश चवरे यांच्या मार्गदर्शनात सपोनि संतोष मनवर, पोलीस अंमलदार योगेश गटलेवार, विनोद राठोड, प्रशांत हेडाऊ, अजय डोळे, रितुराज मेडवे, आकाश सहारे, सर्व स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ तसेच पोउपनि महेंद्र साळवे पो.स्टे कळंब यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

**(संतोष मनवर)**

**सहायक पोलीस निरीक्षक**

**स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ**